**सरकारतर्फे साक्षीदार क्र.४ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः –विठ्ठल मारोती कांबळे,

वय – ६२ वर्षे, व्यवसाय–शेती ,

राहणार – रा.होसुर, ता.निलंगा, जि. लातूर .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर.पाटील यांचे मार्फत सुरुः–**

१. कालीदास धोंडीराम बिरादार यांना मी ओळखत नाही. दिनांक १६.०९.२०२२ रोजी मी कालीदास बिराजदार यांच्या घरी बोगस वैद्यकीय तपासणी आणि कार्यवाही मोहीम पथक यांच्या सोबत गेलो नव्हतो. कालीदास बिरादार यांच्याकडून जप्ती पंचनामा मध्ये उल्लेख केलेली वैद्यकीय उपरकणे आणि साहित्य पोलीसांनी माझ्या समक्ष जप्त केले नव्हते. पोलीसांनी मला पंचनाम्यावर सही करण्यास सांगितली होती. (आता मला प्रस्तुत कामातील दि. १६.०९.२०२२ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला) त्या जप्ती पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नाही. त्यामधील मजकुर आता मला वाचून दाखवण्यात आला. त्याप्रमाणे माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा झालेला नाही. त्यास **निशाणी २४** देण्यात आली.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६.०९.२०२२ रोजी मी कालीदास

बिराजदार यांच्या घरी बोगस वैद्यकीय तपासणी आणि कार्यवाही मोहीम पथक यांच्या सोबत मी गेलो होतो. (आता मला प्रस्तुत दि.१६.०९.२०२२ रोजीच्या जप्त पंचनाम्यामधील अधोरेखांकीत भाग अ वाचून दाखवण्यात आला.) हे म्हणणे खरे नाही की, त्या अधोरेखांकीत भाग अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे औषधे, वैद्यकीय उपकरणे माझ्या समक्ष जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा केला, मला वाचून दाखवला आणि त्यानंतर त्याच्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्याकरिता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. एच.व्ही.आलमले यांनी नाकारला–**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.05.15 10:37:23 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–१३/०५/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,
निलंगा